**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)** **Media Coordination Cell**
गणेशखिंड रोड, पुणे- ७ Ganeshkhind Road, Pune-7

..........................................................................................................................

१० नोव्हेंबर २०१७

**<u>प्रसिद्धीपत्रक</u>**

# कोणी काय आहार घ्यावा याबाबत विद्यापीठ भेद मानत नाही!

- 'शेलारमामा सुवर्णपदका'च्या देणगीदारांशी चर्चा करून योग्य निर्णय घेऊ

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची भूमिका

पुणे -

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे देण्यात येणारे 'शेलारमामा सुवर्णपदक' हे २००६ सालापासून देण्यात येते. त्याच्यासाठीचे निकषही तेव्हापासूनच अस्तित्वात आहेत. त्या निकषांनुसार शैक्षणिक गुणवत्ता असलेल्या तसेच, खेळाडू, निर्व्यसनी आणि शाकाहारी विद्यार्थ्याला प्राधान्य दिले जाते. मात्र, कोणी कोणत्या प्रकारचा आहार घ्यावा याबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कोणताही भेद करत नाही आणि मानतही नाही. त्यामुळे या सुवर्णपदकाचे देणगीदार किंवा त्यांचे वारसदार यांच्याशी चर्चा करून आहाराच्या निकषाबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी अधिकृत भूमिका विद्यापीठातर्फे जाहीर करण्यात येत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे देण्यात यणाऱ्या 'शेलारमामा सुवर्णपदका'साठी पात्र होण्यासाठी विविध अटींमध्ये शाकाहाराची अट असल्याबाबत बातम्या काही प्रसिद्धिमाध्यमांमध्ये प्रसारित झाल्या आहेत. त्याबाबत विद्यापीठाची भूमिका पुढीलप्रमाणे-

१. ही शिष्यवृत्ती विज्ञान आणि इतर विद्याशाखांसाठी आलटून पालटून दिली जाते. ती

**२००६ साला**पासून सुरू आहे. त्याबाबतचे निकषही तेव्हापासूनच अस्तित्वात आहेत.

२. या निकषांनुसार विद्यार्थ्याची अभ्यासक्रमातील विशेष गुणवत्ता, दहावी-बारावी-पदवी परीक्षेतील गुण, त्याचा दैनंदिन जीवनातील आचार, विविध खेळांमधील प्राविण्य, प्राणायाम-योगासन-ध्यानधारण यातील गती, गायन-नृत्य-वक्तृत्व-नाट्य-इतर कला यांच्यातील नैपुण्य, रक्तदान-श्रमदान-पर्यावरणरक्षण-साक्षरता-स्वच्छता याबाबत जागरूकता तसेच, शाकाहारी आणि निर्व्यसनी असणे यांना प्राधान्य देण्यात आले आहे. हे सर्व निकष २००६ सालापासून अस्तित्वात आहेत. त्यात नव्याने कोणतीही भर टाकण्यात आलेली नाही.

३. विद्यार्थ्यांनी कोणता आहार घ्यावा याबाबत विद्यापीठ कोणताही भेद करत नाही आणि तसा भेद मानतही नाही.

४. याबाबत 'शेलारमामा सुवर्णपदका'च्या देणगीदारांशी चर्चा करून योग् तो निर्णय घेतला जाईल.

............................................................................................................................

**अभिजित घोरपडे**

विशेष कार्याधिकारी

माध्यम समन्वय कक्ष

९८२२८४०४३६

abhighorpade@gmail.com

avghorpade@unipune.ac.in